दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजश भांगे

● बीड/महाराष्ट्र ● गुरूवार दि.२० फेब्रुवारी २०२५ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-११६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## माझ्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज हे फक्त नाव नाही, तर आराध्य दैवत

मुंबई-महाराष्ट्रासह देशभरात आज ठिकठिकाणी शिवजयंती उत्साहात साजरी केली जात आहे. पुणे जिल्ह्यातील शिवनेरी किल्ल्यावर राज्य शासनाच्या वतीने मुख्य शासकीय शिवजयंती सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांसह महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले आहे. त्यांनी सोशल मीडियावर मराठीतून पोस्ट केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय सरंक्षण मंत्री राजनाथ सिंग, लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनीही सोशल मीडियावर पोस्ट छत्रपती शिवाजी महाराजांना जयंतीनिमित्त अभिवादन केले.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मी त्यांना अभिवादन करतो. त्यांच्या पराक्रमाने आणि दूरदर्शी नेतृत्वाने स्वराज्याची पायाभरणी केली, ज्यामुळे अनेक पिढ्यांना धैर्य आणि न्यायाची मूल्ये जपण्याची प्रेरणा मिळाली. ते आपल्याला एक बलशाली, आत्मनिर्भर आणि समृद्ध भारत घडवण्यासाठी प्रेरणा देत आहेत, असे नरेंद्र मोदी यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे.

# जल्लोष शिवजयंतीचा! बीडमध्ये ऐतिहासिक शिवजयंती साजरी

## संदीपभैय्यांना मानावेच लागेल-मनोज जरांगे पाटील

## सांस्कृतिक कार्यक्रम,साहसी खेळांची बीडकरांना मेजवानी







**बीड (प्रतिनिधी):** दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहर यांच्या माध्यमातून, आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली डीजेमुक्त आणि वर्गणीमुक्त सांस्कृतिक शिवजयंती सोहळा पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून बीडकरांना विविध कला-क्रीडा सादरीकरणाच्या माध्यमातून अनोखी मेजवानी मिळाली.

सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहक्ष यांच्या आयोजनातून बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर बुधवारी (दि.१९) रोजी शिवजन्मोत्सव सोहळ्याचा कार्यक्रम पार पडला. यावेळी लाखो शिवप्रेमींनी या कार्यक्रमाचा मनमुक्त आनंद घेतला. आ.संदीप क्षीरसागरांनीही ढोल-ताशांच्या आणि शिवगीतांवर ठेका धरला होता. हे पाहून तरुणाई भारावली होती. या कार्यक्रमास बीड शहरासह ग्रामीण भागातील सर्व क्षेत्रातील मान्यवर, लाखो शिवप्रेमी नागरिक उपस्थित होते. अशा प्रकारची शिवजयंती मी पहिल्यांदाच पाहतोय. अशा प्रकारचे कौतुकास्पद नियोजन आणि आयोजन आ.संदीप भैय्या क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेले आहे. महिला भगिनींनाही शिवजयंती उत्सवात सहभागी होता येईल याची काळजी शिवजयंती उत्सव समितीकडून घेतली जाते. ही विशेष बाब आहे. यासाठी तर संदीपभैय्यांना मानावेच लागते. अशा शब्दांत संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी आ.संदीप क्षीरसागर व शिवजयंती उत्सव समितीचे कौतुक केले.करवीर नाद ढोल पथकाच्या तब्बल ४५० कलाकारांचे सादरीकरण तिबेटीयन माँक यांचे शाओलीन मार्शल आर्ट या चित्तथरारक साहसी खेळाच्या सादरीकरणाने प्रेक्षकांच्या काळजाचा ठोका चुकवला.पश्चिम बंगाल येथील 'रायबिशी आर्ट स्कूल' नावाच्या पथक ऍक्रोबाईक्स फाईट आणि वेगवेगळे चित्त थरारक प्रात्यक्षिके सादर केली.ओडिशा राज्यातील 'दुलदुली बाजा' नावाचे आदिवासी वाद्य पथकाने आपली लोकनृत्य सादर केले. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या लाईट आणि लेजर शो-ने प्रेक्षकांचे लक्ष वेधले.

# बीडमध्ये चार महिन्यांपासून कंत्राटी कर्मचारी नियुक्तीच्या प्रतीक्षेत

## न्यायासाठी मा.पालकमंत्री मा.अजितदादा पवार यांना साकडे

**केज । प्रतिनिधी**




महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत कामकाजासाठी विविध पदांची भरती केली जाते. यात ,ऐ.पी.ओ. पी.टि.ओ. व सी.डी.ई.ओ. यांचा प्रामुख्याने समावेश आहे. ग्रामीण भागात रोजगार मिळवून देन्यासाठी या योजनेचा महत्वाचा वाटा आहे.पाणी प्रश्नावर काम करत असताना उन्हाळ्यातील बरीचशी कामे पुर्ण करण्यात ही योजना यशस्वी ठरली आहे. सध्या बीड जिल्ह्यात शेतकऱ्यांमार्फत सिंचन विहीर, विहीर पुन:भरण, जलतारा, शेततळे ईत्यादी कामांची मागणी होत आहे. सध्या ही कामे पूर्णत्वाकडे नेण्यासाठी कार्यरत असलेले कर्मचारी मनुष्यबळ यासाठी अपुरे पडताना दिसत आहे.२७/०९/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुद्येय पदांच्या संख्येनुसार बीड जिल्ह्यात एकूण २३९ पदांची आवश्यकता असताना आजरोजी फक्त १७६ पदेच भरली आहेत. बीड जिल्ह्यामध्ये ६३जागा अजूनही रिक्त असून त्यापैकी फक्त ४७ जागांसाठी दि.१३/१०/२०२४ पर्यंत कंत्राटी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले होते. सदरील उपलब्ध करून देण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना अजूनही नियुक्त्या दिलेल्या नाहीयेत.यामुळे सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामांचा ताण वाढत चालला आहे.परिणामी कर्मचारी अभावी बीड जिल्ह्याची म.ग्रा.रो.ह.यो योजनेत वेळेत काम करण्याची गुणवत्ता महाराष्ट्रात सर्वात खाली गेली आहे. पुरेसे कर्मचारी उपलब्ध नसल्याने सदरील म.ग्रा.रो.ह.यो योजनेत शेतकऱ्यांची कामे पुर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांना दिवसेंदिवस ताटकळत रहावे लागत आहे,यामुळे लाभार्थ्यांनाही वेळेत मजुरी उपलब्ध होण्यास सध्या विलंब होत आहे.कर्मचारी अभावी शेतकऱ्यांना व मजुरांना अशा होणाऱ्या नाहक त्रासाला नाईलाजाने सामोरे जावे लागत आहे.सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांनी नियुक्त्याबाबत विचारणा केली असता बीड जिल्ह्याचे प्रशासन सकारात्मक असूनही चार महिन्यांपासून कंत्राटी कर्मचारी यांना मिळणारे तुटपुंजे मासिक वेतनही नियुक्ती अभावी मिळत नाहीये करिता परिवाराचा आर्थिक बोजा कंत्राटी कर्मचाऱ्यांवर वाढतच चालला आहे.करिता बीड जिल्ह्याचे मा.पालकमंत्री मा.अजितदादा पवार यांनी चार महिन्यांपासून रखडलेल्या नियुक्त्याकडे लक्ष घालून कंत्राटी कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी भावना सर्वत्र कंत्राटी कर्मचाऱ्यात व्यक्त होत आहे.

# मराठा सेवा संघाचे मराठा भूषण पुरस्कार जाहीर!

**बीड । प्रतिनिधी**

मराठा सेवा संघ बीड व अंतर्गत सर्व कक्ष यांच्या वतीने दरवर्षी शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो या वर्षीही शिवजन्मोत्सव सोहळा दि. २१/२/२०२५ वार शुक्रवार रोजी ठीक सायं. ७ वा यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड या ठिकाणी संपन्न होत आहे.कार्यक्रम प्रसंगी विविध क्षेत्रात कार्यरत समाजातील तळागाळातील व्यक्तीसाठी योगदान देणाऱ्या समाज रत्नांचा मराठा भूषण पुरस्कार देऊन विशेष गौरव करण्यात येणार आहे.

शिवजन्मोत्सव सोहळ्यात मराठा भूषण पुरस्काराने सामाजिक व उद्योग क्षेत्रात अतुलनीय कार्य करणारे रमेश भाऊ पोकळे तर वैद्यकीय क्षेत्रात भरीव कामगिरी करणारे प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.शरद शिंदे यांना मान्यवरांच्या हस्ते मराठा समाजभूषण पुरस्कार देवून गौरव करण्यात येणार आहे.

यावेळी प्रसिद्ध विचारवंत ज्ञानेश महाराव यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे उद्धघाटक बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.शिवश्री अशोक थोरात साहेब तर कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवश्री डॉ.ज्ञानेश मोकाटे उपमुख्य कार्यकारी





अधिकारी जिल्हा परिषद बीड हे असून प्रमुख उपस्थिती मध्ये शिवश्री एल.पी.गळगुंडे जिल्हा कोषागार अधिकारी बीड,शिवश्री चंद्रकांत शेळके तहसीलदार बीड,शिवश्री प्रवीणकुमार वानखेडे गटविकास अधिकारी बीड,शिवश्री अशोक ठाकरे विभागीय अध्यक्ष मराठा सेवा संघ यांची उपस्थिती राहणार आहे.या सर्व मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये शिवश्री रमेश पोकळे,शिवश्री डॉ शरद शिंदे यांना मराठा समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तरी सर्व शिवप्रेमींनी शिवजन्मोत्सव व मराठाभूषण पुरस्कार सोहळयास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन मराठा सेवा संघ बीड,संभाजी ब्रिगेड व अंतर्गत सर्व कक्षाच्या वतीने करण्यात येते.

# अखंड हिंदुस्तानला प्रेरणा देणारे छत्रपती शिवाजी महाराज ऊर्जा स्त्रोत-अँड.संकाये



**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

अठरापगड जातींना सोबत घेऊन स्वराज्याची स्थापना छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाच्या सोळाव्या वर्षी केली. छत्रपती शिवराय अखंड हिंदुस्तानला प्रेरणा देणारे ऊर्जा स्त्रोत आहेत. शिवचरित्रातून ही ऊर्जा संबंध जाती धर्माच्या लोकांच्या मनात आजही आहे असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे जयंतीदिनी केले. १९ फेब्रुवारी हा दिवस संबंध महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अँड. मनोज संकाये मित्र मंडळाच्यावतीने परळी येथील शिवाजी चौकातील महाराजांचा अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी मुंजाभाऊ साठे, राम जोशी, कैलास रिकीबे, काशिनाथ सरवदे, शिरीष सलगरे,संतोष पिसे, वैजनाथ केंद्रे, सोमनाथ नाईकवाडे, दगडू भाळे, संतोष कांबळे, पत्रकार मोहन चव्हाण, प्रवीण रोडे, वैजनाथ चौधरी, नितीन चव्हाण, बालू गुट्टे आदीसह मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# शिवरामपुरी मठ संस्थान कायमच आमचे ऊर्जास्त्रोत-आ नमिता मुंदडा

## वरपगाव येथील एक कोटी रुपयांच्या सभामंडपाचे लोकार्पण

**केज । प्रतिनिधी**

वरपगाव येथील शिवरामपुरी मठ संस्थान हे कायमच आमचे श्रद्धास्थान राहिलेले आहे ईथुन मिळणारी ऊर्जा आम्हाला कायमच लोककल्याणकारी कामे करण्यास सतत प्रेरणा देणारी राहिली असल्याचे उदगार आ नमिता मुंदडा यांनी महंत रामकृष्ण महाराज वरपगावकर यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित कार्यक्रम व सभामंडपाच्या लोकार्पण कार्यक्रमात काढले तालुक्यातील वरपगाव येथील शिवरामपुरी मठसंस्थान व येथील महंत कै रामकृष्ण महाराज यांच्यावर श्रद्धा असणारे भाविक लाखोंच्या संख्येने महाराष्ट्रत आहेत याठिकाणी वर्षभर धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते या कार्यक्रमांना असंख्य



लोकांची उपस्थिती असते पण हे धार्मिक कार्यक्रम होण्यासाठी याठिकाणी सभामंडपच नसल्याने गैरसोय होत होती हि बाब आ नमिता मुंदडा यांच्या लक्षात आल्याने त्यांनी यासाठी विशेष प्रयत्न करत प्रादेशिक पर्यटन विकास निधी अंतर्गत येथे भव्य सभामंडप होण्यासाठी एक कोटींचा निधी मंजूर करून घेतला होता या कामाचे भूमिपूजन सहा महिन्यांपूर्वी होऊन कै रामकृष्ण महाराज यांच्या पुण्यस्मरणानिमित्त होणाऱ्या सप्ताहापर्यंत याचे काम पूर्ण करण्याचा संकल्प त्यांनी बोलून दाखवला होता त्यानुसार रामकृष्ण महाराजांच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तनावेळी मठाचे महंत हभप भगवान महाराज यांच्या हस्ते या भव्यदिव्य सभामंडपाचे लोकार्पण करण्यात आले यावेळी जेष्ठ नेते नंदकिशोरजी मुंदडा , राजेसाहेब देशमुख , सुनील गलांडे , ऋषिकेश आडसकर , नेताजी शिंदे , शरद इंगळे ,भगवान केदार , हनुमंत भोसले , धनंजय देशमुख , महादेव सूर्यवंशी , लिंबराज फरके , सुरज घुले , सुरेश नांदे , शिवाजी पाटील , कदीर कुरेशी , संतोष जाधव , व मठ संस्थानच्या विश्वस्तांसह हजारो भक्तांची उपस्थिती होती

# रांजणी जिल्हा परिषद उर्दू शाळेत शिवजयंती साजरी

**जालना । असलम कुरेशी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेत बुधवारी शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांचे अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक आय.एच. पठाण, शिक्षिका तन्विरजहां पठाण, सईदा शेख, हुमा फिरदौस, तहेनियत फरहीन, अझहर शेख, शमीम बेगम, शहरीश अंजुम यांच्यासह पालक व विद्यार्थी संख्येने उपस्थित होते.



## संपादकीय..

# भाजपाला विजयासाठी संघटना महत्त्वाची



दिल्लीमध्ये अरविंद केजरीवालांच्या दशकभराच्या सत्तेला सुरुंग लावत आम आदमी पक्षाला सत्तेवरून खाली खेचत भाजपा दिल्ली विधानसभेच्या तख्तावर तब्बल अडीच दशकांनी विराजमान झाला. अलीकडच्या काळात निवडणुका कोणत्याही असो. विधानसभेच्या असो अथवा लोकसभेच्या असो. मोदी है, तो मुमकीन है, हा नारा देशाच्या कानाकोपऱ्यांत विराजमान झाला असल्याने विरोधकांनी निवडणूक काळात प्रचारादरम्यान आरोपांचा गोंधळ घालायचा, मतदारांनी मतदान करायचे, मतदान प्रक्रिया संपल्यावर एक्झिट पोलवाल्यांनी सत्तेवर भाजपा व मित्रपक्ष कसा विराजमान होणार, हे सांगायचे आणि मतमोजणीच्या दिवशी भाजपा व भाजपाच्या मित्रपक्षांनी बहुमत मिळवायचे, असाच प्रकार सुरू आहे. अगदी काल, परवा झालेल्या दिल्ली विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकाही याला अपवाद ठरल्या नाहीत. दिल्ली विधानसभेच्या ७० जागांपैकी तब्बल ४८ जागांवर विजय मिळवत भाजपाची दिल्लीची सत्ता मिळविली. सत्ता मिळविल्यावर जमिनीवर पाय ठेऊन विजयाचा विनम्रपणे स्वीकार कसा करायचा, हे आपल्या लोकशाही देशातील सर्वच राजकीय, राष्ट्रीय पक्षांनी शिकण्यासारखे आहे. महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीत भाजपा व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'न भूतो, न भविष्यते' असे यश मिळवूनही कोठेही विजयाचा जल्लोष साजरा केला नाही. कोठेही गदारोळ नाही, कोठेही विरोधकांवर राजकीय चिखलफेक नाही.

सत्ता मिळताच देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने कामाला सुरुवात केली. दिल्ली विधानसभा निवडणुकीत स्वबळावर दोन तृतीयांशपेक्षा अधिक जागा मिळवत स्वबळावर भाजपाने सत्ता संपादन केली.दिल्लीचा विजय मिळविताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे यश कार्यकर्त्यांना, पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना आणि पक्षसंघटनेला समर्पित केले. त्यावेळेला कोणताही राजकीय नेता, पदाधिकारी यापेक्षा संघटना महत्त्वाची हा लाखमोलाचा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी दिला. यश येते व जाते, पण संघटना भक्कम असल्यावर, संघटनेच्या पाठीशी कार्यकर्त्यांनी जनाधार उभा केल्यावर संघटनेला सत्तेपासून कोणीही वंचित ठेवू शकत नाही, या स्वरूपात मार्गदर्शन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संघटनेचे महत्त्व अधोरेखित केले. भाजपा पक्षाचा स्थापनेपासूनच इतिहास पाहिल्यावर या पक्षामध्ये नेत्यांना, पदाधिकाऱ्यांना नव्हे, तर ग्रासरुटच्या कार्यकर्त्यांना महत्त्व दिले जाते. संघटनेला महत्त्व दिले जात आहे. भाजपा पक्षसंघटनेवर आरएसएसचा प्रभाव असल्याने कार्यकर्त्यांच्या मनावर बालपणापासूनच संघटना सर्वोच्च स्थानी हेच बिंबविले जात असते. पूर्वीच्या अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणींचा भाजपा ओळखला जात असायचा, आता तोच भाजपा नरेंद्र मोदी-अमित शहा यांची ओळख सांगत आहे. आज वाजपेयी व अडवाणींचा परिवार भाजपात कोठेच दिसत नाही? उद्या मोदींच्या बाबतीतही हेच चित्र पाहावयास मिळणार आहे. परवा हाच कित्ता अन्य कोणी भाजपामध्ये गिरवताना पाहावयास मिळणार आहे. व्यक्ती येतील आणि जातील, पण पक्षसंघटना कायम राहणार आहे. त्यामुळे जी गोष्ट स्थायी असते, तिचेच महत्त्व वाढविण्यासाठी जीवन समर्पित करावे अशी भाजपाच्या कार्यकर्त्यांची कार्यप्रणाली आहे.काँग्रेस आणि भाजपा या दोन देशांमध्ये मुळात हाच तर आज खरा फरक आहे. काँग्रेसने संघटनेऐवजी घराणेशाहीला महत्त्व दिल्याने आणि सत्तेची धुरा घराणेशाहीपुरतीच सीमित राहिल्याने आज देशाच्या राजकारणात काँग्रेस पक्ष देशोधडीला लागला आहे. नेहरू-गांधी घराणे आज भारतीयांच्या लक्षात आहे, पण या घराण्यांनी ज्या काँग्रेसच्या बळावर देशाची सत्ता अमर्यादपणे अनेक वर्षे उपभोगली, तो काँग्रेस पक्ष आज कोठे आहे?, तर आज काँग्रेस पक्ष अस्तित्वासाठी संघर्ष करत आहे. २०१४ पासून सुरू झालेल्या राजकीय पिछेहाटीनंतर काँग्रेसला अस्तित्वासाठी संघर्ष करण्याची वेळ आलेली आहे. गोव्यात पर्रिकर, मध्य प्रदेशामध्ये शिवराजसिंह चौहान, उत्तर प्रदेशामध्ये कल्याणसिंह यासारखी अनेक नावे देशाच्या कानाकोपऱ्यांत विखुरलेल्या राज्यांमध्ये भाजपाचे नेतृत्व करत होती. आज भाजपा त्या-त्या राज्यात सत्तेवर असला तरी त्या-त्या राज्याच्या सत्तेची धुरा नवनवीन नावाकडे पाहावयास मिळत आहे. महाराष्ट्रातही काँग्रेसचा विचार केल्यास ठरावीक नावांपुरतीच काँग्रेसची पक्षसंघटना आजही सीमित असल्याचे दिसून येते. त्याच घराण्यांनी पक्षसंघटना सांभाळायची आणि सत्ता मिळाल्यावर त्याच घराण्यांनी सत्तेत मंत्रीपदे मिळवायची, असाच कारभार सुरू होता. त्यामुळे घराणी राजकारणात, पक्षसंघटनेत कायम राहिली, पण काँग्रेसची मात्र सत्तेतून पायउतार होण्याची वेळ आली.भाजपा सत्तेवर येताच अनेक राज्यांमध्ये भाजपाचे कमळ फुलले. पण राजकीय घराणी मात्र भाजपामध्ये बदलत गेली असली तरी सत्ता मात्र वाढत गेली. आज देवेंद्र फडणवीस महाराष्ट्र भाजपामध्ये सर्वेसर्वा असले तरी उद्याच्या काळात फडणवीस घराण्यांच्या जागी दुसरे कोणीतरी भाजपाचे महाराष्ट्रात नेतृत्व करताना पाहावयास मिळेल. भाजपाची आज राजकीय भरभराट २०१४ पासून खऱ्या अर्थांने सुरू झाली असली तरी त्याचा पाया खऱ्या अर्थांने वाजपेयी-अडवाणींच्या काळात रचला गेला आहे. अर्थांत त्यांना कल्याणसिंह, सुषमा स्वराज, प्रमोद महाजन यांच्यासारख्या अनेक रथी-महारथींनी साथ दिली आहे. महाराष्ट्रापुरता विचार करावयाचा झाल्यास आज फडणवीस भाजपाच्या बोटीचे मुख्य खलाशी असून मुंडे, तावडे, बावनकुळे, पाटील, मुनगंटीवार अशी अनेक नावे भाजपाच्या बोटीचे राजकीय भवसागरात संतुलन राखण्याचे काम करत आहेत. अर्थांत काही वर्षांपूर्वी गोपीनाथ मुंडे, प्रमोद महाजन, एकनाथ खडसे यांच्यासारख्यांनी भाजपाची यशस्वी धुरा सांभाळली. भाजपाने जर काँग्रेससारखा कुटुंब कल्याण कार्यक्रम जोपासला असता तर भाजपा व काँग्रेसमध्ये आज कोणताही विरोधाभास दिसला नसता. भाजपाने नेहमीच पक्षसंघटना व तळागाळातल्या कार्यकर्त्याला केंद्रभूत मानले. काँग्रेसने मात्र सत्ताकारण कुटुंबांपुरतेच सीमित ठेवले. त्यामुळे यातील अनेक कुटुंबे आज काँग्रेसच्या सत्ताकारणाला राजकीय घरघर लागताच अन्य पक्षांमध्ये निष्ठेचे गोडवे गाऊ लागले आहेत. संघटना महत्त्वाची हा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्ली विजयानंतर देताना यशाचा विनम्रपणे स्वीकार करा, यशाची हवा डोक्यात जाऊ देऊ नका, जमिनीवर पाय ठेवा, असा सल्ला देताना आपल्या लोकाभिमुख कार्यातून पक्ष संघटनेचा जनाधार वाढवण्याचे निर्देश दिले आहेत आणि हेच भाजपाच्या यशाचे कालचे, आजचे आणि उद्याचे गमक राहणार आहे.

# शेतकऱ्यांच्या राज्यासाठी...!




ग्राहकांपर्यंत आर्थिक सेवा आणि उत्पादने मोबाइल द्वारे वितरीत करणाऱ्या तंत्रज्ञानाला 'फीनटेक' म्हटल जात. हल्ली बँकेचे जवळपास सर्व आर्थिक व्यवहार देखील मोबाइल ॲप एका क्लिक वर होऊ लागले आहेत. आता बँक म्हटले की लोकांकडून ठेवी जमा करणारी आणि त्यातून नफा कमावणारी संस्था असा आपला समाज आहे. पण एक बँक अशीही आहे की जी शेतकऱ्यांच्या भल्यासाठी स्थापन झाली आहे. ही बँक दुसऱ्यांकडून निधी गोळा करते आणि त्याची गुंतवणूक कृषी उद्योग आणि शेतकऱ्यांमध्ये करते या स्टार्टअपचे नाव आहे 'रूट कॅपिटल.'रूट कॅपिटल ही विनानफा तत्वावर चालणारी एक कृषी कर्जवाटप संस्था आहे. ती मुख्यत्वे कृषीसंस्थांमध्ये गुंतवणूक करते. या संस्था छोट्या शेतकऱ्यांकडून पिके खरेदी करतात आणि मोठ्या कंपन्यांना विकतात. आफ्रिका, दक्षिण अमेरिका आणि आशियाच्या अविकसित भागांमधील कृषीसंस्था आणि शेतकऱ्यांना वित्तपुरवठा करण्याचे काम रूट कॅपिटल करते. तिची विशेषता म्हणजे जे शेतकरी माध्यम वर्गाच्या गटात मोडतात ते छोटे कर्ज मिळवण्यासाठी अपात्र मानले जातात आणि त्याच वेळी व्यावसायिक बँकांच्या मोठे कर्ज देण्याच्या निकषांमध्येही बसत नाहीत आशा शेतकऱ्यांना ती मदत देते.ग्रामीण समृद्धीला चालना देण्यासाठी कृषी उद्योगांना स्वस्त व माफक दरात वित्तपुरवठा उपलब्ध करून देण्याचे व्रत अंगीकारून या स्टार्टअपने १९९९मध्ये जे इवलेसे रोपटे लावले होते त्याचा आता विशाल वृक्ष झाला आहे. कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या जगभरातील अग्रगण्य स्टार्टअपमध्ये आज त्याची गणना होत आहे.गेल्या २५ वर्षांत रूट कॅपिटलने अशा आठशेहून अधिक कृषी उद्योग आणि २३ लाख शेतकऱ्यांना तब्बल दोन अब्ज डॉलरचे आर्थिक सहाय्य केले आहे. शेतकऱ्यांना वित्तपुरवठा करण्यासाठी रूट कॅपिटल खासगी देणगीदार आणि वित्तसंस्था या दोघांकडूनही निधी गोळा करते. या शेतकऱ्यांची प्रगती, रोजगारनिर्मिती, महिला सक्षमीकरण आणि त्यांचे जीवनमान सुधारण्यात या संस्थेने मोलाचा वाटा उचलला आहे.रूट कॅपिटलच्या रौप्य महोत्सवी वर्षात आम्ही दोन अब्ज डॉलर रकमेचा टप्पा गाठला ही विशेष बाब आहे, असे रूट कॅपिटलचे संस्थापक आणि सीईओ विली फूट म्हणतात. आमच्या शेतकरी सदस्यांनी केलेल्या कठोर परिश्रमांमुळे हे साध्य झाले. त्यांच्याशी भागीदारी करण्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. ग्रामीण भागातील समृद्धी वाढवण्याच्या आणि जगभरातील शेतकरी कुटुंबांच्या जीवनात चैतन्य आणण्याच्या आमच्या ध्येयाप्रती आम्ही पूर्णपणे कटिबद्ध आहोत.रूट कॅपिटल ही मदत १. वित्तपुरवठा, २. सल्ला आणि ३. प्रोत्साहन अशा तीन प्रकारे करते. खेडेगावांतील छोट्या व्यवसायांना अल्पकालीन आणि दीर्घकालीन कर्जाद्वारा वित्तपुरवठा केला जातो. या कर्जाचा योग्य विनिमय कसा करावा याचे शेतकऱ्यांना आर्थिक प्रशिक्षण दिले जाते. तसेच जास्तीत जास्त नफा कमावता यावा म्हणून शेतीच्या नवनवीन पद्धती अमलात आणण्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले जाते.

स्त्रियांचा शेतीतील सहभाग वाढवा यासाठी रूट कॅपिटलने २०१२मध्ये महिला कृषी उपक्रम सुरू केला. या उपक्रमांतर्गत संस्थेने महिलांनी सुरू केलेल्या उद्योगांमध्ये खास गुंतवणूक आणि त्यांना प्रशिक्षण देणे सुरू केले. त्यासाठी या व्यवसायांमध्ये ३० टक्के महिला शेतकरी आणि कर्मचाऱ्यांचा सहभाग बंधनकारक करण्यात आला. या प्रयोग एवढा यशस्वी झाला की रूट कॅपिटलच्या गुंतवणुकीतील अशा व्यवसायांची संख्या आता ५० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे.

रूट कॅपिटल ही आफ्रिका, दक्षिण अमेरिका आणि आशियातील प्रामुख्याने कॉफी उत्पादक शेतकऱ्यांसाठी काम करते. संस्थेने गुंतवणूक केलेले उद्योग या शेतकऱ्यांनी पिकवलेली कॉफी, कोको, मॅकाडेमिया नट्स, काजू, धान्य आदी उत्पादने खरेदी करतात. या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी आणि त्यांचा पुरवठा सुरळीत असावा यासाठी रूट कॅपिटलने केयुरिग डॉ पेपर, स्टारबक्स, वॉलमार्ट आणि आयकिया फाऊंडेशन अशा बड्या कंपन्यांशी करार केला आहे.आपल्या पिकांना अपेक्षित बाजारपेठ आणि योग्य मूल्य न मिळाल्यामुळे छोट्या ग्रामीण शेतकऱ्यांना त्यांची उत्पादने कमी किमतीत विकणे भाग पडते आणि त्यामुळे ते गरिबीच्या चक्रात खोल अडकत जातात. त्यांची ही अडचण दूर करण्याचे आणि त्यांना समृद्धीचा मार्ग दाखवण्याचे श्रेय निर्विवादरीत्या रूट कॅपिटलला जाते.

# दरकरातीतून स्वस्ताईची आस



रिझर्व्ह बँकेचे नवे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी चालू आर्थिक वर्षातील पतधोरणाचा शेवटचा द्वैमासिक आढावा शुक्रवारी सादर करताना रेपो दरात पाव टक्का कपात करून तो ६.२५ टक्क्यांवर आणला. बँका रिझर्व्ह बँकेकडून पैसा कर्जाऊ घेतात आणि त्याबदल्यात रिझर्व्ह बँक या बँकांकडून काहीएक दराने व्याज वसूल करते. त्या व्याजाचा दर म्हणजे रेपो दर. तो पाच वर्षांत बदलण्यात आला नव्हता. करोना महासाथ, भूराजकीय घडामोडी यांत भारतीय अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय व्यापारात सुस्थापित करणे, देशांतर्गत व्यापार सावरणे, महागाई अशा अनेक कारणांमुळे रिझर्व्ह बँकेला रेपो दरात कपात करण्यासाठी पुरेसा अवकाशच सापडत नव्हता.

शुक्रवारी जाहीर झालेल्या पतधोरणाच्या द्वैमासिक आढाव्यात मात्र नव्या गव्हर्नररांनी रेपो दरात कपात केली. यातून उद्योग जगत, अर्थ जगत आणि सरकार यांना सुखद धक्का देतानाच गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी पदार्पणानंतर या तिन्ही घटकांचा विश्वास जिंकण्याचा प्रयत्न केला, असे म्हणायला वाव आहे. रेपो दरात पाव टक्का कपात केल्यामुळे बँकांना स्वस्तात रिझर्व्ह बँकेकडून पैसा उपलब्ध होणार आहे. सध्या बँकांकडे पतपुरवठ्यासाठी पुरेसा पैसा उपलब्ध नाही. म्हणून बँका ठेवींवरील व्याजदर वाढवून ठेवी आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत. ठेवींवर अधिक दराने व्याज देण्यासाठी कर्जे महाग करण्यावाचून आणि मोठ्या प्रमाणावर कर्जवितरण आणि नियमित वसुलीशिवाय पर्याय नाही. अर्थात ही स्थिती विचित्र आहे. पैसा नाही म्हणून कर्जवितरण नाही आणि कर्जवितरण नाही म्हणून ठेवींवर आकर्षक व्याज देता येत नाही, त्यामुळे ठेवीदार आकर्षित होत नाहीत; मग पुन्हा ठेवींचा पैसा नाही म्हणून कर्जवितरण मोठ्या प्रमाणावर करता येत नाही, असे हे चक्र आहे. ते भेदण्याचा प्रयत्न रेपो दरात कपात करून गव्हर्नररांनी केला आहे. दरकपात झाल्यामुळे बँकांच्या हाती तुलनेने स्वस्तात पैसा येईल, ज्यातून त्या पतपुरवठा करू शकतील आणि बँकांनी मनात आणल्यास कर्जे स्वस्त होतील.

अर्थात, दरकपातीचा लाभ बँकांनी कर्जदारांना दिला तरच हे शक्य होईल, कर्जे स्वस्त झाली तर ठेवीवरील व्याजदर खाली येण्याची शक्यता आहे. तरीही, कर्जे स्वस्त होणार असल्यामुळे सर्वसामान्य कर्जदार आणि कर्जेच्छुक नागरिक मात्र खूष होईल, यात शंका नाही. कंपन्यांना लागणारी कर्जेही येत्या काळात स्वस्त होतील, ज्याचा फायदा उद्योगांना होऊन औद्योगिक उलाढाल वाढण्याचीही शक्यता आहे. जे होणे आता गरजेचे आहे.

# कुटुंबव्यवस्था ढासळल्यामुळे समाजव्यवस्था विस्कळीत



एकत्र कुटुंबात राहायचे म्हटले, तर बंधने आलीत, कर्तव्य-पालन आलं, शिस्त आली, जबाबदारी आली अन् कुटुंबाला अभिप्रेत असलेली मिळून-मिसळून-सर्वांशी जुळवून घेऊन वागण्याची स्वभावप्रवृत्ती आली. आज अशी बंधनं माणसाला नको आहेत.आपण सातत्याने म्हणतो सामाजिक वातावरण बदलले आहे, परिस्थिती पहिल्यासारखी राहिली नाही, लोकं बदलली, स्वभाव बदलले, माणसांमध्ये नीतिमत्ता, मूल्य राहिली नाहीत, खरेपणा उरला नाही. खरंतर समाज हा अनेक कुटुंबाचा समूह असतो. अनेक प्रकारची, अनेक जाती, धर्म, पंताची कुटुंब एकत्र येऊन एका ठिकाणी वास्तव्य करतात तेव्हा समाज तयार होतो. कोणत्याही गोष्टीची मग ती चांगली असो वा वाईट सुरुवात ही कुटुंबापासून होते. हे कुटुंब म्हणजेच घर मग ते अगदी एक-दोन माणसाचं असो वा वीस-तीस जणांचं असो, त्यातलं वातावरण, संस्कार, त्यातल्या लोकांची वागणूक, स्वभाव, त्यांची कृत्य हेच समाजावर प्रभाव टाकत असतात. या ठिकाणी आपण एक उदाहरणं घेऊ. एका चार- पाच लोकांच्या कुटुंबातील लोकं वेगवेगळ्या स्वरूपाची कामं करतात. जसे की एक जण शाळेत शिक्षक आहे तो मुलांना ज्ञान देतो. एक जण पुजारी आहे तो लोकांना मंदिरात पूजेला सहकार्य करतो, त्यांना पुण्य कमवायला हातभार लावतो. त्याच कुटुंबातील एकजण किराणा दुकान चालवतो. लोकांना जीवनावश्यक गोष्टी पुरवून स्वतःचा उदरनिर्वाह करतो. एकजण भाजीपाला विकतो आणि ग्राहकाला रोज ताजी भाजी पुरवतो आणि शेतकऱ्यांना पोट भरायला मदत करतो. म्हणजेच या कुटुंबातील प्रत्येकजण समाजासाठी काहीना काही योगदान चांगल्या मार्गाने देतात आणि स्वतः पण अर्थार्जन करतात. या उलट दुसऱ्या एका कुटुंबात दोन-तीन लोकं असून त्यातील एक जण दररोज लोकांना लुबाडणे, चोऱ्या करणे यासारखे कामं करतो, त्याच घरातील दुसरा व्यक्ती हा चोरून आणलेला माल विल्हेवाट लावतो आणि तिसरा या दोघांच्या चोऱ्या चुकीचा धंदा समाजापासून लपवून ठेवण्यासाठी वेगवेगळ्या क्लृप्त्या करत असतो. लोकांना वेगवेगळी कारणं देऊन समाजाची दिशाभूल करत असतो. आता आपण राहत असलेल्या समाजात दोन प्रकारची कुटुंब आहेत जे समाजात चांगल्या वाईट गोष्टी घडायला किंवा घडवायला कारणीभूत ठरत आहेत. एखादा सभ्य सुसंस्कृत साधा माणूस जर चोर भामट्याकडून लुबाडला गेला तर तो नशिबाचा भाग म्हणून जे गेलं ते सोडून देईल. एखादा सुशिक्षित असेल तर तो कायदेशीर मार्गाने जाऊन ते परत मिळवण्यासाठी प्रयत्न करेल. एखादा अर्धवट किंवा विकृत मनोवृत्तीचा असेल तर तो त्या चोराला शोधून मारहाण करेल, त्याला जीवे मारेल, शिवीगाळ करेल थोडक्यात तो हिंसाचार मार्ग अवलंबून न्याय मिळवण्यासाठी प्रयत्न करेल. म्हणजेच याठिकाणी दोन कुटुंबात वितुष्ठ आलं, दुश्मनी आली, भांडण आलं आणि दोन कुटुंबातील हा वाद त्यांच्या पुरता न राहता आता सामाजिक विषय बनला आहे. अशाप्रकारे छोट्या छोट्या गोष्टी ज्या घरोघरी घडतात त्याच समाजावर छाप टाकत असतात आणि कुटुंबांना धाक न राहिल्यामुळे, मर्यादा न राहिल्यामुळे घरातील गोष्टी बाहेर येऊन त्याचं बाजारीकरण होऊ लागलं आहे आणि समाजात हे विष पसरू लागलं आहे. एकत्र कुटुंब पद्धती संपवून छोटी छोटी कुटुंब तयार होत चालल्यामुळे एकमेकांना सामावून घेणे, समजावून घेणे, सांभाळून घेणे होत नाही. मनातल्या गोष्टी घरात बोलल्या जात नाहीत तर त्या घराबाहेरील लोकांकडे व्यक्त केल्या जातात. ज्यांच्याकडे त्या व्यक्त होतात ते जर तितकेच योग्य विचारसरणीचे नसतील तर आपल्याला दिशाहीन करतात आणि आयुष्य भरकटले जाते. असे घरोघरी प्रत्येकासोबत होत असल्यामुळे समाजच चुकीच्या दिशेने वाहत जातो.अजून एक उदाहरणं म्हणजे जेव्हा कोणत्याही घरातील पती अथवा पत्नी विवाहबाह्य संबंध ठेवते तेव्हा ती किंवा तो दुसऱ्या कुटुंबाला म्हणजेच कोणाच्या तरी पतीला अथवा पत्नीला त्रासदायक ठरत असते, कोणाचे तरी घर संसार मोडत असते. म्हणजेच एका कुटुंबातील व्यक्तीमुळे दुसऱ्या कुटुंबातील व्यक्तीला त्रास होत असतो. पर्यायाने दोन्ही कुटुंबातील लोकांना त्रास होऊन समाजाचे हे घटक भविष्यात. कोणत्याही भयानक परिणामांचे बळी ठरू शकतात. आता ज्याची पत्नी किंवा जिचा पती विवाहबाह्य संबंध ठेवतोय ती व्यक्ती पण विचार करते आपण सुद्धा असे करायला काय हरकत आहे? आपण का एकटं राहायचं? आपण का अन्याय सहन करायचा आणि आपलं मन मारून जगायचं? मग ती व्यक्ती पण कुठे न कुठे स्वतःला गुंतवते, स्वतःसाठी कोणीतरी शोधते आणि अजून एक कुटुंब डिस्टर्ब होते. असं होतं होत ही विवाहबाह्य संबंधाची साखळी कधी संपत नाही आणि समाजात अनैतिक संबंध फोफावले जातात. अशावेळी आपण म्हणतो आजकाल समाजात विवाहबाह्य संबंध खूप वाढले आहेत पण त्याची सुरुवात कुटुंबापासूनच झाली हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

जेव्हा कोणतीही घटना आपल्या घराबाहेर जाते तेव्हा ती सामाजिक विषय बनते आणि समाज रचना बिघडते. म्हणूनच आपण म्हणतो घराबाहेर काही जायला नको. त्यामुळे इज्जत जाते, बदनामी होते, लोकं आपल्याबद्दल चुकीचं बोलतात, आपला अप प्रचार होतो. हे जर टाळायचं असेल तर कुटुंबाला शिस्त असणं, संस्कार असणं खूप महत्वाचे आहे.

# शिवजयंती निमित्त रायगड प्रतिष्ठान आयोजित रक्तदान शिबिरात २३० रक्तदात्यांचे रक्तदान

## पत्रकार दिनकर शिंदे यांचे २४ व्या वेळी रक्तदान

**गेवराई | प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती देशभरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शिवजयंती निमित्त गेवराईत रायगड प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या रक्तदान व नेत्र तपासणी शिबारत दुपारी ४ वाजेपर्यंत तब्बल २३० जणांनी रक्तदान केले. डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष, ज्येष्ठ पत्रकार दिनकर शिंदे यांनी २४ व्या वेळी रक्तदान करून आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावले. याबद्दल त्यांचा रायगड प्रतिष्ठानकडून यथोचित गौरव करण्यात आला.

रायगड प्रतिष्ठान गेवराईच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी शिवजयंती निमित्त शास्त्री चौक येथे रक्तदान व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आली होते. याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्यास सर्व शिवभक्तांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात दुपारी ४ वाजेपर्यंत शहरातील तब्बल २३० रक्तदात्यांनी रक्तदान करून आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावले. सर्व रक्तदात्यांचा सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असलेले डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष, ज्येष्ठ पत्रकार दिनकर शिंदे यांनी २४ व्या वेळी रक्तदान केले. त्याबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



याप्रसंगी रायगड प्रतिष्ठानचे रोहित पंडित, महेश दाभाडे, अमोल करांडे, राजेंद्र मोटे, सचिन मोटे, प्रताप खरात, ॲड स्वप्नील येवले, यशवंत पाटील, बबलू खराडे, शरद खरात, कृष्णा मुळे, गोपाल मोटे, ज्ञानेश्वर पराड, रंजित सराटे, मनोज टाक, माऊली बेदरे, डॉ बी आर मोटे, डॉ सर्वोत्तम शिंदे, दत्ता मोटे, विठ्ठल मोटे, जितेंद्र लेंडाळ, श्याम चाळक, संदीप चौधरी, सुरेंद्र रुकर, धम्मपाल कांडेकर, विनोद सौंदरमल, राम रानमारे, धनंजय बेदरे, राम चौधरी, संदीप साळवे, माऊले व्हरकटे, रवी दहिवाळ, गणेश मोटे, महादेव काळे, राजेश टाक, संदीप पवार, रितेश बजाज, अमर वाधवाणी, संजय पाडुळे आदींची उपस्थिती होती.

जीवनदायी ब्लड बैंक बीड च्या बाळासाहेब पवार आणि दत्ता आघाव यांच्या टीमने रक्तदात्यांसाठी योग्य नियोजन केले होते. दरम्यान आयोजित शिवजन्मोत्सव व रक्तदान शिबिरास आ विजयसिंह पंडित, युवानेते रोहित पंडित, युवानेते यशराज पंडित, युवानेते शिवराज पवार, पोलीस निरीक्षक प्रवीण कुमार बांगर, नगर परिषद मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, जुनेद बागवान, सुभाष सुतार, शेख हरून, सखाराम शिंदे आदींसह सर्व पत्रकार, नागरिक, लोकप्रतिनिधी व सामाजिक पदाधिकाऱ्यांनी भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले.

## बदलापुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे भव्य अनावरण



**बदलापूर | प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर असलेल्या बदलापुरात शिवरायांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्याचे अनावरण उत्साहात पार पडले. या वेळी शेकडो शिवप्रेमी, भगव्या पताका, ढोल–ताशांच्या गजरात, लेझीम पथकाच्या तालावर आणि शिवकालीन वेशभूषेतील कलाकारांच्या साक्षीने अनावरण सोहळा संपन्न झाला. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'च्या गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणून गेला.

पुतळा अनावरणाच्या वेळी लाडक्या भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिवप्रतिमेला मानवंदना दिली. संपूर्ण परिसर भगवामय झाला होता. मुख्यमंत्री फडणवीस यांचे स्वागत बदलापूरच्या बहिणींकडून विशेष सन्मानाने करण्यात आले. अनावरणानंतर शाळेच्या मैदानात फडणवीस यांची विशेष सभा आयोजित करण्यात आली, जिथे शिवप्रेमी, भाजपा कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

या भव्य पुतळ्याच्या स्थापनेसाठी स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी विशेष पुढाकार घेतला होता. पुतळ्यासाठी मंजुरी विधानसभा निवडणुकीपूर्वी मिळाली होती, मात्र निर्मितीसाठी लागणाऱ्या वेळेमुळे विधानसभेनंतर त्याचे काम पूर्ण झाले. सोमवारी हा पुतळा पुण्यातील कार्यशाळेतून बदलापूरकडे निघाला आणि अनेक अडचणींवर मात करत बुधवारी शहरात मोठ्या मिरवणुकीनंतर दाखल झाला.

बदलापूरचा शिवाजी महाराजांशी ऐतिहासिक संबंध असून, लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या शिवजयंती आणि गणेशोत्सवाला येथे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असे. १९२० पासून येथे शिवजयंती आणि सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जात आहे. इतकेच नव्हे, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील येथे शिवजयंतीसाठी उपस्थिती लावल्याचा उल्लेख इतिहासात आहे. त्यामुळे बदलापूरच्या प्रवेशद्वारावर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्याचे स्वप्न अखेर साकार झाले.

## पक्षाची विचारधारा तळागळा पर्यंत पोहोचवा विधिमंडळ पक्षनेते आ.विजय वडेट्टीवार

### चंद्रपूर येथे सत्कार समारंभ व कार्यकर्ता बैठक

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

धर्मांधतेतून अराजकता पसरविणे व खोटी आश्वासने देऊन सत्ता काबीज करणे हाच विरोधकांचा डाव असून अशा गंभीर परिस्थितीतून जर पक्षाला नवी उभारी द्यायची असेल तर पक्षाची विचारधारा घरोघरी पोहोचवा. असे आवाहन काँग्रेसचे नवनियुक्त विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार यांनी केले. ते चंद्रपूर येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित सत्कार समारंभ व कार्यकर्ता बैठकीत सत्कार मूर्ती म्हणून बोलत होते.



आयोजित सत्कार समारंभ व बैठकीस प्रामुख्याने चंद्रपूर शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष रामू तिवारी, माजी महिला जिल्हाध्यक्ष सुनीता लोढीया, धोबे, माजी नगरसेवक नंदू नागरकर, प्रवीण पडवेकर, माजी सभापती दिनेश चोखारे, घुगु शहर काँग्रेस अध्यक्ष राजू रेड्डी, सय्यद रमजान अली मंचावर उपस्थित होते. यावेळी काँग्रेस नेते, राज्याचे माजी विरोधी पक्षनेते त्याचा ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्र आमदार विजय वडेट्टीवार यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड झाल्याबद्दल शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.याप्रसंगी कार्यकर्त्यांना मार्गदर्शनपर बोलताना विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार म्हणाले की, सत्ताधारी विरोधक सत्ता काबीज करण्यासाठी मोठे अर्थकारण, खोटी आश्वासने, प्रलोभने असा कुठलाही स्तर गाठत असून निवडणुकी मध्ये विजयश्री मिळविण्यासाठी वाटेल ते करीत आहे. अशा विरोधकांना समर्थपणे तोंड देण्यासाठी पक्षातील आपसी गटबाजी विसरून प्रत्येक कार्यकर्त्यांनी मी व माझा पक्ष असे ध्येय अंगीकारू पक्षाची धर्मनिरपेक्ष विचारधारा तळागळापर्यंत पोहोचवावी. यासाठी अथक परिश्रम घेणे काळाची गरज आहे. आगामी काळात होऊ घातलेल्या निवडणुका लक्षात घेता आपण सर्वांनी जोमाने कामाला लागावे असेही ते यावेळी म्हणाले. तर मागील निवडणुकांमधील चुकांची पुनरावृत्ती होऊ नये याची अधिकाधिक काळजी घेऊन प्रत्येक कार्यकर्त्यांनी पक्ष संघटनेवर जोर देऊन कार्य केल्यास आगामी निवडणुकांमध्ये आपण विरोधकांशी यशस्वीरित्या लढू असे आव्हाने त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तिवारी यांनी केले यावेळी काँग्रेस पक्षाचे बहुसंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

## हर्षवर्धन सपकाळ यांनी स्वीकारली काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पदाची सूत्रे

**मुंबई (वृत्तसंस्था):** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे नवीन प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज टिळक भवन इथे चार्ज घेतला. या प्रसंगी राज्य प्रभारी रमेश चेन्नीथला, ज्येष्ठ नेते मुकुल वासनिक, मावळते प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधी मंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे उपस्थित होते.

काँग्रेसमधील अनेक मोठ्या नेत्यांची नावे चर्चेत असताना पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी हर्षवर्धन सपकाळ यांना प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आहे. हर्षवर्धन सपकाळ यांचे नाव समोर आल्यानंतर अनेकांचे डोळे मोठे झाले होते. इतकेच नाही तर माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी देखील याबाबत आश्चर्य व्यक्त केल्याचे पाहायला मिळाले. त्यांच्या निवडीमुळे पक्षातील काही वरीष्ठ नेते नाराज असल्याचे देखील सांगितले जात आहे. त्यामुळे आजच्या समारंभाला अनेक मोठ्या नेत्यांनी दांडी मारली.तर मला वैयक्तिक काम असल्यामुळे मी समारंभाला उपस्थित नसल्याचे काँग्रेसचे नेते नितीन राऊत यांनी म्हटले आहे.



### गेवराईत शिवशाही महानाट्य पाहण्यास गर्दी उसळली

## आ.विजयसिंह पंडित यांच्या तगड्या नियोजनात शिवजन्मोत्सव सोहळा साजरा

**गेवराई | प्रतिनिधी**

गेवराई शहरात आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली शारदा प्रतिष्ठान आणि राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यात सायंकाळी ऐतिहासिक शिवशाही महानाट्याचा पहिला शो दिमाखात सुरु झाला. यावेळी शहाजीराजे आणि शिवरायांचा इतिहास डोळ्यात साठविण्यासाठी गेवराई शहरासह विधानसभा मतदारसंघाती नागरिकांनी उत्स्फूर्त गर्दी केली होती. आ.विजयसिंह पंडित यांच्या तगड्या नियोजनात महानाट्याच्या शुभारंभासह शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक, माजी मंत्री शिवाजीराव (दादा ) पंडित, माजी आमदार विलासराव खरात, धाराशिव येथील एनईपी शुगरचे नानासाहेब पाटील, तहसिलदार संदिप खोमने,

अभिनेते प्रकाश धोत्रे, महेश कोकाटे, डॉ. राजेश आहेर, रमेश रोकडे, दिग्दर्शक महेंद्र महाडिक यांच्यासह समितीचे अध्यक्ष शैलेश तोष्णीवाल, कार्याध्यक्ष संदिप मडके, युवानेते रणविर पंडित यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते व शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन, शस्त्रपुजन, मुख्य रंगमंच पुजन, अश्वपुजन आणि श्री गणेशाची आरती करुन महानाट्याच्या शुभारंभ शोला प्रारंभ झाला. आ. विजयसिंह पंडित यांनी शिवजन्मोत्सव सोहळा व महानाट्याचे सातत्याने यशस्वी आयोजन करुन





शिवाजीमहाराजांचे विचार सामान्य माणसापर्यंत घेऊन जाण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. राजा कसा असावा याचा आदर्श पुढच्या पिढीला कळावा हाच उद्देश त्यांचा आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघात यामुळे उत्कृष्ट वातावरण तयार झाले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, शिवरायांचे आठवावे रुप, आठवावा प्रताप यासाठी या महानाट्याचे आयोजन केले आहे. शिवरायांचा इतिहास पुढील पीढीला सांगण्यासाठी हा शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित केला जातो. येणाऱ्या काळात शिवरायांचे स्मारक आणि अश्वारुढ पुतळा गेवराई शहरात उभारला जाईल अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. शिवजन्मोत्सवानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर आधारित शिवशाही या ऐतिहासिक महानाट्याचा तीन प्रयोग शिवजन्मोत्सवानिमित्त विनामुल्य आयोजन करण्यात आले आहे. शुभारंभाचा पहिला प्रयोग सर्वांसाठी असुन गुरुवार दि. २० रोजीचा प्रयोग केवळ महिलांसाठी आणि शुक्रवार दि. २१ रोजीचा प्रयोग शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला असल्याचे सांगून सर्व शोचा आनंद सर्वांनी घ्यावा असे आवाहन विजयसिंह पंडित यांनी यावेळी केले. पाच मजली किल्ल्याची हुबेहुब प्रतिकृती, शोभीवंत सिंहासन मेघडंबरी, जहाजाचा वापर करुन महाराजांच्या कोकण मोहिमेचा जिवंत देखावा, भव्य राज्याभिषेक सोहळा, शिवकालीन शस्त्रास्त्रे व युद्ध साहित्य यासह अधुनिक ध्वनी व प्रकाश योजना, घोडे, बैलगाडी, पालखी, नेत्रदिपक अतिषबाजी यांचा वापर करुन मराठा व पातशाही यांच्या तलवारींचा खणखणाट, तोफांचा गडगडाट, अग्नीबाणांचा वर्षाव असा घनघोर रणसंग्राम पाहून उपस्थित रसिक आणि शिवप्रेमी नागरिक भारावले राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समिती व नगर परिषद, गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी गेवराई शहरातील बाजार तळ येथे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. यावेळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज बाल उद्यानाचे लोकार्पण भवानी अर्बन बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे यांच्या शुभहस्ते तर आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात आले. यावेळी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित, शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळ्याचे अध्यक्ष शैलेश तोष्णीवाल, कार्याध्यक्ष संदिप मडके, सहकार्याध्यक्षप्पदी संतोष सुतार, उपाध्यक्षपदी अँड मनोज हजारे, स्वप्निल मोटे, अमजद शेख, बंटी सौंदरमल

सचिवपदी राहुल मस्के, सहसचिवपदी शहादेव निकम, कोषाध्यक्षपदी पप्पू पठाण, सह कोषाध्यक्षपदी रणजित घुंबार्डे यांची तर कार्यकारणी सदस्य म्हणून प्रभाकर भालशंकर, प्रदीप सुतार, धीरज गळगुंडे, मयूर गव्हाणे, वसीम फारोकी, सुभाष गुंजाळ, जयसिंग माने, अशोक बेद्रे, संजय दाभाडे, कमलाकर हातागळे, सादिक शेख, विशाल हुंबे, मोहसीन बागवान यांच्यासह शिवप्रेमी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महामानव अभिवादन ग्रुप व महामानव सार्वजनिक वाचनालय यांचा संयुक्त विद्यमाने निवड व नियुक्ती झालेल्यांचा सत्कार

## वंचित घटकांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्वाची संधी म्हणजे आरक्षण-संजय मस्के

**बीड । प्रतिनिधी**

प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचित व बहुजन समाजाकरिता, देशहिता करिता घेतलेले अपार कष्ट व माता रमाईचा त्याग न विसरता आपण लोकसेवक आहोत याचे भान नवनियुक्त कर्मचाऱ्यांनी सदैव ठेवावे व जिद्द चिकाटी व सर्व महामानवांच्या आदर्श विचारा नुसार वर्तन यशाकडे घेऊन जाते असे उद्गार अध्यक्षपदी लाभलेले जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के यांनी काढले.

महामानव अभिवादन ग्रुप व महामानव सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्तविद्यमानेमाने धानोरा रोड बीड येथे एम.पी.एस.सी. तर्फे निवड झालेल्या व वैद्यकीय अधिकारी सेवेत रुजू झालेल्या अशा ९ जणांचा सत्कार समारंभ आयोजित प्रसंगी पि.व्ही बनसोडे, शहाजी पारवे, सुरेश साबळे, उत्तमराव पवार, दयानंद सरपते विचार मंचाचावर उपस्थित होते.

प्रमुख उपस्थितीमध्ये महामानव अभिवादन ग्रुपचे डी.जी.वानखेडे, प्रशांत वासनीक,यु.एस.वाघमारे अँड.तेजस वडमारे, दशरथ मकासरे, बि.डी. तांगडे, अर्जुन जंजाळ,सुजाता वासनिक हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक जी.एम. भोले यांनी करून महामानव अभिवादन ग्रुपच्या मार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध समाज उपयोगी उपक्रमाबद्दल माहिती दिली. बहारदार सूत्रसंचालन डी.एम.राऊत यांनी केले. सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध व सर्व आदर्श महापुरुषांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्प, पुष्पमाला वाहून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महसूल सहायक पदी निवड झालेल्या मयुरी तुरुकमारे, सोनिया ससाने, प्राजक्ता तांगडे, प्रमिमा साळवे, राधा डोळस, रेणुका दळवी (आरोग्य सेविका) शैलेश जोगदंड, गौरव साळवे, डॉ. विशाल तांगडे यांचा त्यागमूर्ती माता रमाई यांचे जीवन चरित्र पुस्तक व पेन पुष्पगुच्छ शाल देऊन मान्यवरांच्या हस्ते हृदयी सत्कार करण्यात आला.



सत्काराला उत्तर देताना आपल्या मनोगतात राधा डोळस म्हणाली की अत्यंत गरीब परिस्थिती असताना आई-वडिलांनी उच्च शिक्षणाकरिता बाहेरगावी पाठवले. त्यांचे कष्ट सतत डोळ्यासमोर ठेवून व माता रमाईचा बाबासाहेबांच्या व समाजाकरिता त्याग आठवून आपले ध्येय प्राप्त करण्याकरता कितीही त्रास झाला तरी अपयश हे यशाची पहिली पायरी आहे हे थोरा चे मनात उद्गार बिंबवून एम.पी.एस.सी.मार्फत सेवेत रुजू होत आहे हे सांगताना तिचा कंठ दाटून आला. तर शैलेश जोगदंड यांनी आपल्या प्रभावी मनोगतात स्पष्ट केले की सर्वच निवड झालेल्यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. परंतु शिक्षण हे असे एक शस्त्र आहे, ते जीवनातील सर्वच कठीण प्रश्न सोडवण्यास जीवनभर मदत करते.

प्रमुख पाहुणे दयानंद सरपते म्हणाले की प्रशासकीय सेवेत स्वाभिमानाने लोकसेवा करून दिलेल्या विभागातील कामांची इतंबूत माहिती घेऊन कोणाच्याही दबावाखाली न येता चुकीचे काम करू नये असे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. सेवानिवृत्त पी.आय. शहाजी पारवे यांनी देखील सरकारी सेवा करत असताना अनेक अडचणी येतात परंतु नियमांचे पालन करून वंचित, अन्यायग्रस्तांना मदत करून आपण समाजाचे काही देणे लागतो हा बहूमोल विचार सतत समोर ठेवून महसूल सहाय्यक या पदाच्याही पुढील पदे स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून मिळवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करावा. प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त सिओ बनसोडे पीव्ही यांनी स्पष्ट केले की संविधानाला अपेक्षित असलेले, हया आजच्या ९ सत्कारमूर्ती पैकी ६ मुली आहेत याचा अर्थ स्त्रियांना रूढी परंपरेने नाकारलेल्या प्रगतीची द्वारे खुली करणाऱ्या सावित्रीच्या ह्या लेखी कोणत्याही क्षेत्रात यश प्राप्त करू शकतात हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्री पुरुष लिंगभेद न करता त्यांना समान संधी देण्याच्या संविधानातील तरतुद किती दूरदृष्टीची व बहुमोलाची आहे हे दिसून येते. कार्यक्रमास परिसरातील बहुसंख्य महिला व पुरुष सत्कार मूर्तींचे पालक व महामानव अभिवादन ग्रुपचे बहुसंख्य सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.अशोक गायकवाड यांनी केले.

# शिक्षण विभागाला जागा करण्यासाठी कार्यालयासमोर जागरण गोंधळआंदोलन करणार-वर्षाताई जगदाळे

## २५ जानेवारी पासून शिक्षण विभाग कार्यालयासमोर एक महीला आमरण उपोषणास बसल्या मात्र अधिकाऱ्यांचं दुर्लक्ष !

**बीड । प्रतिनीधी**

मिल्लीया माध्यमिक शाळेतील अन्यायाविरोधात रहेमत बेगम अजमत उल्लाह खान या मागील अनेक दिवसांपासून लढा देत आहेत. दिनांक २५ जानेवारी २०२५ पासून त्या जिल्हा परिषद शिक्षण विभाग कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसल्या आहेत. मात्र, प्रशासनाने अद्यापही त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले आहे.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) शिक्षण विभागाला इशारा दिला आहे. दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी जर त्यांच्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत, तर मनसेतर्फे शिक्षण विभाग कार्यालयासमोर जागरण गोंधळ आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मनसे राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी दिला आहे. रहेमत बेगम या ऊब्ररलशींशी आणि इश्रेव



Pressure सारख्या गंभीर आजारांनी त्रस्त असताना देखील, प्रशासनाने त्यांच्या आरोग्याची काळजी घेतलेली नाही. मिल्लिय शाळेशी संबंधित या प्रकरणाचा वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही, असा आरोप करण्यात येत आहे.मनसेने प्रशासनाला कडक शब्दांत इशारा देत म्हटले आहे की, राज्य माहिती आयोगाच्या आदेशांची अंमलबजावणी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई झाली नाही, तर पुढील सर्व परिणामांना शिक्षण विभाग जबाबदार राहील.आता प्रशासन यावर काय भूमिका घेते आणि मनसे आंदोलनाची पुढील दिशा काय असेल ?हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# अंबाजोगाई ग्रामपंचायत कार्यालय पिपळा धायगुडा येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात संपन्न

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अठरापगड जातींना एकत्र करून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे तोरण उभारले छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाच्या सोळाव्या वर्षी रायरेश्वराच्या मंदिरात अठरा पगड विविध जाती धर्माच्या लोकांना एकत्र करून स्वराज्याचे तोरण बांधले असे प्रतिपादन रशिकांत धायगुडे यांनी यांनी केले शिवजयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. ग्रामपंचायत पिपळा धायगुडा येथे उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आली १९ फेब्रुवारी हा दिवस संबंध महाराष्ट्रासाठी अभिमानाचा दिवस आहे. याच दिवशी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला. त्यांचे शौर्य, पराक्रम आणि दूरदृष्टीपणा आजही संबंध महाराष्ट्राला नव्हे तर देशाला



ऊर्जा देणारा आहे म्हणूनच इतिहासामध्ये त्यांचे अग्रगण्य स्थान आहे म्हणून आजच्या युवा पिढीने छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास वाचून त्याचे अनुकरण केले पाहिजे असे यावेळी ते म्हणाले●प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले ग्रामसेवक सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य कर्मचारी व नागरिक उपस्थित होते .

# कोष्टी शिक्षक संघातर्फे सत्कार समारंभ संपन्न




**बीड । प्रतिनिधी**

श्री चौंडेश्वरी देवी मंदिर बीड येथे कोष्टी समाजातील गुणवंत विद्यार्थी व आदर्श काम करणारे शिक्षक तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांचा सामूहिक सत्कार यावेळी करण्यात आला.या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून मा संजय पंचगल्ले साहेब शिक्षणाधिकारी योजना जिल्हा परिषद बीड, मा सुरेश असलेकर अध्यक्ष कोष्टी समाज बीड, राज्य आदर्श शिक्षक संजय पडोळे सर, मा श्री.संजय सोळसे साहेब, उद्योजक बाळासाहेब म्हेत्रे, डॉ. शरयू पडोळे व मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रम प्रसंगी समाजातील गुणवंत आदर्श सेवानिवृत्त असे सर्वांचा सत्कार या ठिकाणी करण्यात आला. त्यामध्ये मा. संजय पंचगल्ले साहेब शिक्षणाधिकारी योजना विभाग जिल्हा परिषद बीड, मा. सुरेश असलेकर लेखापरीक्षक पूर्णवादी बँक बीड सेवा निवृत्तीबद्दल, श्रीमती मयुरी म्हेत्रे महसूल सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल, मा. विनोद खडके सर समाज कल्याण विभाग जि प बीड मार्फत आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालाबद्दल, श्रीम पुनम वरोडे यांना मैत्रा फाउंडेशन तर्फे राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार शिक्षक पुरस्कार मिळालेबद्दल सन्मानित करण्यात आले. यावेळी समाज बांधव उपस्थित होते.

# डॉ.अनिता चव्हाण यांची शिक्षण विस्तार अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल बोडखे कुटुंब परिवार तर्फे सत्कार

## संघर्ष आणि मेहनतीतून मिळवलेले यश प्रेरणा देणारे असते-उत्तम बोडखे

**आष्टी । प्रतिनिधी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला वाघिणीचे दूध मानले; माणसाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि समाजामध्ये समता बंधुत्व ऐक्य आणि सर्व धर्म समभाव हे मूल्य रुजवण्यासाठी शिक्षणातून माणसे तयार झाली पाहिजेत असे सांगून डॉ. अनिता चव्हाण ठाकूर यांनी संघर्षातून मिळवलेले यश हे खऱ्या अर्थाने तमाम महिला भगिनींना आणि ग्रामीण भागातील युवक युवतींना प्रेरणा देणारे आहे! असे मत ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांनी आज येथे व्यक्त केले.डॉ.अनिता चव्हाण- ठाकूर यांची शिक्षण विस्तार अधिकारी पदी निवड झाल्याबद्दल बोडखे परिवाराच्या वतीने सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.शाल श्रीफळ आणि ग्रंथ भेट देऊन सत्कार केल्यानंतर श्रीयुत उत्तम बोडखे



अभिनंदन करताना बोलत होते.यावेळी ज्येष्ठ अध्यापिका सौ. बबीताताई बोडखे उपस्थित होत्या.डॉ.चव्हाण अनिता उत्तमराव , इयत्ता पहिली ते दहावी पर्यंत शिक्षण जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी तालुका आष्टी जिल्हा बीड येथे झाले. बारावी पर्यंत शिक्षक हंबर्डे महाविद्यालय आष्टी या ठिकाणी पूर्ण केल्यानंतर पुढील शिक्षण डी.एड. गीता कन्या महाविद्यालय बीड या ठिकाणी पूर्ण केले.त्यानंतरचे पुढचे सगळे शिक्षण मात्र यशवंतराव चव्हाण विद्यापीठ नाशिक या ठिकाणाहून पूर्ण करत करत बी.एड.,एम.एड.या पदव्या घेतल्या तसेच विषय संप्रेषण आणि इंग्रजी या दोन विषयांमध्ये देखील एमए झालेला आहे.२०१८ साली सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे यांची सेट परीक्षा शिक्षणशास्त्र या विषयात उत्तीर्ण झाले.२०२० आली डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर येथून पी.एचडी सन्मानित झाली.सेट आणि पीएच.डी या दोन्ही परीक्षा शिक्षणशास्त्र या विषयांमध्ये पूर्ण केल्या आहेत. २०२२ साली डी.एस.एम ही परीक्षा देखील उत्तीर्ण झाले. २०२४ ला सरळ सेवा भरती ने झालेली शिक्षण विस्तार अधिकारी पदाची परीक्षा जिल्हा परिषद नाशिक या ठिकाणाहून उत्तीर्ण होऊन आज रोजी पंचायत समिती पेठ या ठिकाणी शिक्षण विस्तार अधिकारी या पदावर कार्यरत आहेत.डॉ.अनिता चव्हाण यांची शिक्षण विस्तार अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल बोडखे कुटुंब परिवार तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोडखे कुटुंबाने डॉ.चव्हाण यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.डॉ. चव्हाण यांनीही या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक जोमाने काम करण्याचा मनोदय व्यक्त केला.

# मॉडर्न ग्रुप ऑफ स्कूलतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांची ३९५ वी जयंती उत्साहात साजरी

**छत्रपती संभाजीनगर । संजय तुपे**

मॉडर्न इंटरनॅशनल स्कूल गंगापूर आणि मॉडर्न इंग्लिश मीडियम स्कूल, मयूर पार्क यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराजांची ३९५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी शाळेच्या अध्यक्षा श्रीमती बिंदू विश्वंभरम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्राचार्या श्रीमती अपर्णा सोनटक्के, प्राचार्या श्रीमती कविता गवते, समन्वयक प्राध्यापक संजय तुपे यांच्या उपस्थितीत भव्य शिवजयंती रॅलीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी लेझीम पथक, काठी नृत्य, तसेच अफजलखान वध या नृत्यातून छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम सादर केला. शिवरायांच्या वेशभूषेत आलेल्या बालगोपालांनी वातावरण अधिकच रंगतदार केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर भाषणे दिली, तर शिक्षकांनी देखील मार्गदर्शनपर विचार मांडले.या कार्यक्रमास शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसर छत्रपती शिवाजी महाराज की जय च्या जयघोषांनी दुमदुमून गेला. अखेरीस राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077